---

३३) सदर प्रकरणी अर्जदार यांनी प्रकरणी ७/१२ उतारे सादर केलेले असून सदर ७/१२ उताऱ्याच्या इतर अधिकारामध्ये शेरे असून जागेवर विकास कार्य सूरू करणेपूर्वी सदरचे शेरे उतरून घेणे अर्जदार / विकसक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

३४) सदर प्रकरणी ७/१२ च्या इतर अधिकारातील क्षेत्राकरिता संपादन क्षेत्राबाबत उपजिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पुणे यांस अधिसुचित नकाशाचा सांक्षांकित प्रत निवाड प्रत मोजणी नकाशा सह या कार्यालयास मिळणेबाबत विनंती पत्र प्राधिकरणामार्फत पाठविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने जा.क्र. ३८४ दि. १०/०३/२०२२ अन्वये उप जिल्हाधिकारी तथा पा्रदेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पुणे यांचेमार्फत पत्र प्राधिकरणास प्राप्त झालेले आहे. त्यास अधिन राहून सदरची परवानगी देण्यात येत आहे.

३५) अर्जदार यांचेमार्फत सादर मोजणी नकाशा व मो.र.न. अता /१३मो.र.न. अता ९२०४/१३ दि. १३/०६/२०१३ व दि. ०८/०७/२०१३ अन्वये हिरव्या रंगाने एमआयडीसीची प्रयोजनार्थ राखिव क्षेत्र असे नमूद केलेली मोजणी नकाशा सादर केलेला आहे. त्यास अधिन राहून सदरची परवानगी अदा करण्यात येत आहे. तरी याबाबत भविष्यात कोणताही वाद निर्माण झाल्यास सर्वस्वी अर्जदार / विकसक / जमिनमालक जबाबदार राहीतील याची प्राधिकरणास कोणत्याही प्रकारची तोषिश लागू देणार नाही.

३६) प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ कलम २६ (१) अन्वये पुणे महानगर प्रदेश क्षेत्राच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिध्दी दि. ०२/०८/२०२१ रोजी झालेली आहे. सदर प्रारूप विकास योजनेमध्ये सदरची मिळकत रहिवास + MIDC या विभागामध्ये समाविष्ट असून ३० मी व २४ मी (SH१३०) या प्रस्तावित प्रारूप विकास योजना रस्ता रुंदीने बाधित होत आहे. तसेच सदर प्रकरणी प्रस्तावाधिन मिळकत व एम आय डी सी ची हद्द यामध्ये सकृतदर्शनी तफावत दिसून येत असल्याने मो.र.न. ९०००/१३, ९२०४/१३ दि. १३/०६/२०१३ व ०८/०७/२०१३ मोजणी नकाशा व वास्तुविशारद यांचेमार्फत सादर केलेले ट्रॅग्युलेशन नुसार विकास नियंत्रण नियमावली २०१८ मधील नियम क्र. ६.५.१ मध्ये नमूद केलेल्या अधिकाराचा वापर करून हद्दनिश्चित करण्यात आलेली असून याबाबत विकास योजना विभागाकडे अर्जदार यांनी हरकत घेतलेली असून सदर बाबत विकास योजनेचा जो अंतिम निर्णय होईल तो अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३७) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात खाननी शुल्क, प्रिमीयम शुल्क, विकास शुल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

PMRDA
Pune Metropolitan Regional Development Authority, Pune

